महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक :१४४२(२)(३)/२०२२/तेवीस दिनांक : ०१ एप्रिल, २०२४

## -: प्रसिद्धीपत्रक :-

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२२
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीच्या सुधारित कार्यक्रमाबाबत.

संदर्भ :- (१) जाहिरात क्रमांक ०३६/२०२३.
(२) आयोगाचे समक्रमांकाचे प्रसिद्धीपत्रक दिनांक १३ मार्च, २०२४.
(३) आयोगाचे समक्रमांकाचे प्रसिद्धीपत्रक दिनांक २१ मार्च, २०२४.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ वरील प्रसिद्धीपत्रकान्वये महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीचा कार्यक्रम दिनांक १५ ते २७ एप्रिल, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रम निश्चित करताना लोकसभा निवडणूकीतील मतदानाचे टप्पे विचारात घेऊन त्या-त्या टप्प्यातील उमेदवारांना अन्य दिवशी शारीरिक चाचणीसाठी बोलविण्यात आले होते. तथापि भारतीय निवडणूक आयोगाकडील प्राप्त निवेदने विचारात घेता दिनांक १९, २६ व २७ एप्रिल, २०२४ रोजीच्या उमेदवारांची शारीरिक चाचणी अनुक्रमे दिनांक २९, ३० एप्रिल, २०२४ व दिनांक २ मे, २०२४ या दिवशी पोलीस मुख्यालय, रोडपाली, सेक्टर-१७, कळंबोली, नवी मुंबई येथे घेण्यात येणार आहे. शारीरिक चाचणीचा सुधारित सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : नवी मुंबई.